EAU/ICD/2021-22/91
12th August, 21

मसुदा
क्र.४/२०२१–२०२२

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२०२२ मधील २९ जुलै, २०२१ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची चौथी सभा **गुरूवार, दिनांक २९ जुलै, २०२१ रोजी दुपारी ३:०० वाजता** आयेजित करण्यात आली. कोरोना विषाणूंच्या संक्रमणापासून बचाव करण्याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून ही सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात आली.

सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ५. | डॉ. कविता लघाटे | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. अजय भामरे | सदस्य |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ८. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ९. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| १०. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ११. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| १२. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १३. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १४. | डॉ. बळीराम गायकवाड (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १५. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १६. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत :-**

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

➢ **अनुपस्थिती :-**

प्रा. बि. एन. जगताप, प्रा. राजेश खरात यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

➢ श्रध्दांजली :-

**श्रीमती. प्रभा अडावदकर**

ज्येष्ठ गायिका श्रीमती. प्रभा अडावदकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २१ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७४ वर्षांच्या होत्या.

**डॉ. ल. का. मोहरीर**

संत साहित्याचे अभ्यासक डॉ. ल. का. मोहरीर यांचे दिर्घ आजाराने दिनांक २४ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ६६ वर्षांचे होते.

**श्रीमती. माधुरी रावकर**

विनोबा भावे यांच्या कार्यात सक्रिय सहभाग घेतलेल्या सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती. माधुरी रावकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २४ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षांच्या होत्या.

**डॉ. सुमन करंदीकर**

ज्येष्ठ शिक्षणतज्ञ आणि 'आपणच' या संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष डॉ. सुमन करंदीकर यांचे वृध्दपकाळाने दिनांक २८ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षांच्या होत्या.

**श्री. राज कौशल**

प्रसिध्द लेखक दिग्दर्शक श्री. राज कौशल यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ३० जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ४९ वर्षांचे होते.

**श्री. सुभाषचंद्र वाघोलीकर**

विविध वर्तमानपत्रांत काम करत संपादक म्हणून छाप उमटविणारे ज्येष्ठ पत्रकार श्री. सुभाषचंद्र वाघोलीकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०४ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ७१ वर्षांचे होते.

**श्री. महेंद्र सिंह**

मुंबईतील कामगार नेते आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय समितीचे सदस्य कॉ. महेंद्र सिंह यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०४ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ७७ वर्षांचे होते.

**प्रा. सुभाष सोमण**

कीर्ती कॉलजमध्ये प्रदीर्घ काळ अध्यापन केलेले मराठी विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा. सुभाष सोमण यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक ०५ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**श्री. दिलीप कुमार ऊर्फ युसूफ सरवर खान पठाण**

कसदार अभिनय आणि असामान्य प्रतिभेच्या जोरावर तब्बल सहा दशके हिंदी चित्रपटसृष्टीत अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते श्री. दिलीप कुमार ऊर्फ युसूफ सरवर खान पठाण यांचे दीर्घ आजाराने दिनांक ०७ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ९८ वर्षांचे होते.

**श्री. वीरभद्रसिंह**

हिमाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री श्री. वीरभद्रसिंह यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०८ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**डॉ. पी.के.वॉरिअर**

आयुर्वेद क्षेत्रातील भीष्माचार्य आणि कोटटक्कल आर्य वैदय शाळेचे व्यवस्थापिकय विश्वस्त डॉ. पी. के. वॉरिअर यांचे दिर्घ आजाराने दिनांक १० जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते १०० वर्षांचे होते.

**श्री. रघुनाथ विश्वनाथ सीनकर**

ज्येष्ठ पत्रकार श्री रघुनाथ विश्वनाथ सीनकर ऊर्फ भाऊ सीनकर यांचे वृध्दपकाळाने दिनांक ११ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ९४ वर्षांचे होते.

**श्री. मधुसदन नानिवडेकर**

ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार, गझलकार श्री. मधुसदन नानिवडेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ११ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ५६ वर्षांचे होते.

**श्री. यशपाल शर्मा**

भारताचे माजी क्रिकेटपटू श्री यशपाल शर्मा यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १३ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ६६ वर्षांचे होते.

**श्रीमती. सुरेखा सीकरी**

ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती. सुरेखा सीकरी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १६ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी त्या ७५ वर्षांच्या होत्या.

**श्री. अनंत मनोहर**

ज्येष्ठ साहित्यिक श्री अनंत मनोहर यांचे वृध्दपकाळाने दिनांक १७ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ९२ वर्षांचे होते.

**प्रा. वासंती सोर**

नाशिक येथील ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या, विचारवंत लेखिका व शिक्षणतज्ञ प्रा. वासंती सोर यांचे वृध्दपकाळाने दिनांक २० जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या.

**डॉ. शांतीलाल कोठारी**

नागपूरच्या इतिहासातील सुवर्णपान असलेले सोयामिल्कचे संशोधक व लाखोळी डाळीवरील विक्रीबंद हटवण्यासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे डॉ. शांतीलाल कोठारी यांचे वृध्दपकाळाने दिनांक २७ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ७९ वर्षांचे होते.

**श्री. नंदू नाटेकर**

देशातील बॅडमिंटनमधील पहिले विजेतेपद मिळवून देणारे बॅडमिंटनपटू श्री. नंदू नाटेकर यांचे वृध्दपकाळाने दिनांक २८ जुलै २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ८८ वर्षांचे होते.

अतिपर्जन्य वृष्टीमुळे रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग येथे आपले प्राण गमावलेल्या सर्व व्यक्तींना देखील श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दिनांक २४ जून, २०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दि. २४ जून, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.<br>दि. २४ जून, २०२१ रोजीच्या सभेस डॉ. वैभव नरवडे उपस्थित असल्यामुळे उपस्थित सभासदांच्या यादीत त्यांचे नाव समाविष्ट करण्यात आले. | |
| बाब क्र. २ | चेतनाचे रामप्रसाद खंडेलवाल इन्स्टियुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, सर्वे नं. ३४१, गव्हमेंट कॉलनी, बांद्रा (पुर्व), मुंबई- ४०० ०५१ येथून चेतनाचे रामप्रसाद खंडेलवाल इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, बिल्डिंग ४था आणि ५वा मजला, सर्वे न. ३४१, गव्हमेंट कॉलनी, बांद्रा (पुर्व), मुंबई- ४०० ०५१ येथे तात्पुरता स्थलांतर करण्याबाबतचा प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | चेतनाचे रामप्रसाद खंडेलवाल इन्स्टियुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, सर्वे नं. ३४१, गव्हमेंट कॉलनी, बांद्रा (पुर्व), मुंबई- ४०० ०५१ येथून चेतनाचे रामप्रसाद खंडेलवाल इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, बिल्डिंग ४था आणि ५वा मजला, सर्वे न. ३४१, गव्हमेंट कॉलनी, बांद्रा (पुर्व), मुंबई- ४०० ०५१ येथे तात्पुरता स्थलांतर करण्याबाबतच्या प्रस्तावास, स्थलांतर करावयाच्या इमारतीची ओ.सी. सादर करणे, विद्यापीठाचे संलग्नता, परीक्षा इ. कोणतेही शुल्क बाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे व पाच वर्षांकरीता स्थलांतराची परवानगी या अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ३ | सचिव, साकेत ज्ञानपीठ, साकेत कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, साकेत विद्यानगरी मार्ग, चिंचपाडा रोड काटेमानवली, कल्याण (पू.), जि. ठाणे- ४२१ ३०६ या महाविद्यालयाने बी.कॉम. अभ्यासक्रमाच्या दोन तुकडया (तुकडी क्र. ३ व ४) शैक्षणिक वर्ष | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| | २०२०-२१ या वर्षापासून बंद करण्यासाठीचा स्थानिक चौकशी समितीचा अहवाल. | |
| ठराव | सचिव, साकेत ज्ञानपीठ, साकेत कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स, साकेत विद्यानगरी मार्ग, चिंचपाडा रोड काटेमानवली, कल्याण (पू.), जि. ठाणे- ४२१ ३०६ या महाविद्यालयाने बी.कॉम. अभ्यासक्रमाच्या दोन तुकडया (तुकडी क्र. ३ व ४) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षापासून बंद करण्यासाठीच्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालास, महाविद्यालयातील कोणतेही शिक्षक अतिरिक्त होणार नाहीत याची महाविद्यालयाने खबरदारी घेण्याच्या अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ४ | प्राचार्य, अचिवर्स कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट (रात्र पदवी), जय भगवान टॉवर, मुरलीधर अली, परनाका, टिळक चौक, कल्याण (प.), ठाणे- ४२१ ३०१ या महाविद्यालयाचे अचिवर्स कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट (रात्र पदवी), जय भगवान टॉवर, मुरलीधर अली, परनाका, टिळक चौक, कल्याण (प.), ठाणे- ४२१ ३०१ येथून अचिवर्स कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट (रात्र पदवी), एचडीएफसी बॅक जवळ, संतोषी माता मंदिर रोड, न्यु हायस्कुलच्या बाजूला, जोशी बाग, कल्याण (प.), ठाणे-४२१ ३०१ येथे स्थलांतर करण्याबाबतचा प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | प्राचार्य, अचिवर्स कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट (रात्र पदवी), जय भगवान टॉवर, मुरलीधर अली, परनाका, टिळक चौक, कल्याण (प.), ठाणे- ४२१ ३०१ या महाविद्यालयाचे अचिवर्स कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट (रात्र पदवी), जय भगवान टॉवर, मुरलीधर अली, परनाका, टिळक चौक, कल्याण (प.), ठाणे- ४२१ ३०१ येथून अचिवर्स कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट (रात्र पदवी), एचडीएफसी बॅक जवळ, संतोषी माता मंदिर रोड, न्यु हायस्कुलच्या बाजूला, जोशी बाग, कल्याण (प.), ठाणे-४२१ ३०१ येथे स्थलांतर करण्याबाबतच्या प्रस्तावास, स्थलांतर करावयाच्या इमारतीची ओ.सी. सादर करणे, विद्यापीठाचे | |

| | | |
|---|---|---|
| | संलग्नता, परीक्षा इ. कोणतेही शुल्क बाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे व पाच वर्षांकरीता स्थलांतराची परवानगी या अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ५ | शासन निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ अन्वये शिक्षकांच्या आश्वासित प्रगती योजनेद्वारे पदोन्नतीच्या प्रस्तावासाठीचा Annual Performance Assessement Reports (APAR) नमुना व कार्यपध्दती विहित करणेबाबत | महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष |
| ठराव | शासन निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ अन्वये शिक्षकांच्या आश्वासित प्रगती योजनेद्वारे पदोन्नतीच्या प्रस्तावासाठीचा Annual Performance Assessement Reports (APAR) नमुना व कार्यपध्दती विहित करणेबाबतच्या प्रस्तावास विद्वत परिषदेने सुचविलेल्या दुरूस्त्यांसह मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ६ | श्री. सुभाष राजाराम नवाले, सिस्टिम प्रोग्रामर, तात्पुरते यांच्या विभागीय चौकशी अहवालास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | सदरबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व श्री. सुभाष राजाराम नवाले, सिस्टिम प्रोग्रामर, तात्पुरते यांच्या विभागीय चौकशीचा अहवाल मान्य करण्यात आला. तसेच त्यांच्याबाबत Code of Conduct मध्ये असलेल्या तरतूदींनुसार पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना देण्यात आले. | |
| बाब क्र. ७ | मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ आणि विद्यापीठ प्रशासन यांच्या संयुक्त बैठकीत झालेल्या निर्णयानुसार विद्यापीठ प्रशासनाने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुनर्नियुक्ती न करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. त्यामुळे रिक्त झालेल्या पदांवर विद्यापीठातील सेवानिवृत्तीनंतर हंगामी स्वरूपात ठोक मानधनावर पुनर्नियुक्ती करण्यात येत होती मात्र शासनाच्या धोरणानुसार गट-अ, गट-ब, गट-क, गट-ड संवर्गातील पदांवर बाहययंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |

| | | |
|---|---|---|
| ठराव | सदरबाबत मा. प्र-कुलगुरूंनी सभागृहास शासन स्तरावर कंत्राटी नियुक्ती करण्यासाठी PWD मार्फत राबविण्यात येणा-या प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली. त्यावर सांगोपांग चर्चा होऊन यापुढे विद्यापीठास आवश्यक असलेले मनुष्यबळ PWD मार्फत कंत्राटी पध्दतीने घेणेबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ८ | संचालक, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DOICT) हे पद भरण्याकरीताची अर्हता तसेच दैनिक वृत्तपत्रांत जाहिरात पुन:श्च प्रसिध्द करण्यास मान्यता देण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | संचालक, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DOICT) हे पद भरण्याकरीताची अर्हता तसेच दैनिक वृत्तपत्रांत जाहिरात पुन:श्च प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर ठराव याच बैठकीमध्ये मंजूर करण्यात आला. | |
| बाब क्र. ९ | 1. To reconstruct premises of Vidyapeeth Vidyarthi Bhavan (Bombay University Club House) located at B' Road, Churchgate, Mumbai through sponsorship.<br>2. To rename "Vidyapeeth Vidyarthi Bhavan" (Bombay University Club House) reconstructed through the sponsorship as "Sardar Kulwant Singh Kohli Vidyarthi Bhavan". | विद्यार्थी विकास भवन |
| ठराव | श्री. अमरदीप टोनी सिंग, अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक, प्रितम हॉटेल्स समुह, यांनी देऊ केलेल्या देणगीच्या माध्यमातून विद्यापीठ विद्यार्थी भवन (बॉम्बे युनिर्व्हसिटी क्लब हाऊस) या इमारतीची पुर्नबांधणी करण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच पुर्नबांधणी झाल्यानंतर सदर इमारतीचे "सरदार कुलवंतसिंग कोहली विद्यार्थी भवन" (बॉम्बे युनिर्व्हसिटी क्लब हाऊस) असे नामकरण करण्याच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. १० | श्री. एच. एस. केळकर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, श्रीमती निराबाई पारकर विद्यानगरी, ॲट/पोस्ट-देवगड, सिंधुदुर्ग-४१६ ६१३. महाविद्यालयाच्या तक्रारीबाबतचा ई-मेलद्वारे प्राप्त अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | श्री. एच. एस. केळकर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, देवगड या महाविद्यालयाच्या तक्रारीबाबतचा अहवाल मान्य करण्यात आला व समितीच्या शिफारशींनुसार महाविद्यालयास तात्काळ पत्र पाठविण्याबाबत मा. कुलसचिव यांना निर्देश देण्यात आले. | |
| बाब क्र. ११ | अधिष्ठाता मंडळाचा दिनांक २८ जुलै, २०२१ चा ठराव "विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ५९ नुसार ज्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ५६ अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी ३२ महाविद्यालयांमध्ये आणि शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ५४ अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी ३१ महाविद्यालयांत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे त्या महाविद्यालयांवर कारवाईची रुपरेषा ठरविण्यासाठी व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ सादर." | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सदरबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व सर्वानुमते असे ठरविण्यात आले की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी आणि AICTE च्या नियमावलीनुसार या सर्व महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस तात्काळ पाठविण्यात यावी व त्यांची उत्तरे प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाहीबाबत व्यवस्थापन परिषदेमध्ये निर्णय घ्यावा. | |
| बाब क्र. १२ | Proposal to re-start MUST Radio Station (107.8) and the expenditure for the re-starting the same. | दूर व मुक्त अध्ययन संस्था |
| ठराव | सदरबाबत मा. प्र-कुलगुरूंनी सभागृहास सविस्तर माहिती दिली. सखोल चर्चेअंती सर्वानुमते असा ठराव करण्यात आला की, दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या मार्फत MUST या रेडिओ स्टेशन पुन:श्च सुरू करण्यास व संबंधित खर्चासही मंजूरी देण्यात आली. तसेच नवीन नवीन तंत्रज्ञान या Studio मध्ये आणून विविध बदल घडवून | |

| | | |
|---|---|---|
| | शैक्षणिक दृष्टया अधिक चांगला वापर करण्याबद्ल या रेडीओ स्टेशनचा वापर व्हावा असे मा. कुलगुरूंनी सुचविले. | |
| बाब क्र. १३ | To read and approve the minutes of Finance and Accounts Committee Meeting held on 28th July, 2021 under Section 94(2) of the Maharashtra Public Universities Act, 2016. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | The Minutes of Finance and Accounts Committee Meeting held on 28th July, 2021 under Section 94 (2) of the Maharashtra Public Universities Act, 2016 were accepted. | |
| बाब क्र. १४ | Infrastructure development for JBIMS in Vidyanagari, Kalina. | ज. ब. व्य. संस्था आणि पायाभूत सुविधा, नियोजन अंमलबजावणी व देखभाल विभाग |
| ठराव | सदर प्रस्तावाबाबतची सविस्तर माहिती प्रा. कविता लघाटे, संचालक, जमनालाल बजाज संस्था यांनी सभागृहास दिली. तसेच असेही सांगितले की, संस्थेचे माजी विद्यार्थी आणि कॉर्पोरेट सेक्टर यांच्या माध्यमातून सदर बांधकामासाठी निधी उभा करता येईल. सविस्तर चर्चेअंती विद्यानगरी येथे जमनालाल बजाज संस्था यांच्या प्रस्तावित इमारतींच्या उभारणीबाबत देणगीदारांच्या माध्यमातून जमा होणाऱ्या निधीतून बांधकाम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.<br><br>तसेच ॲड. निल हेळेकर यांनी सूचना केल्या की, विद्यापीठाच्या जमिनींवर अतिक्रमण होऊ नये हे पाहणे, संरक्षक भिंत संपूर्णपणे बांधणे, सुरक्षा व्यवस्था वाढविणे, माजी विद्यार्थ्यांची कलम ८ नुसार कंपनी स्थापन केल्यास विद्यापीठास आर्थिक लाभ मिळू शकतील. ॲड. निल हेळेकर यांच्या सूचनांच्या अनुषंगाने मा. कुलगुरूंनी सांगितले की, विद्यापीठाच्या स्पेशल प्रोजेक्ट समितीने त्यांच्या overall planning मध्ये या सूचनांचा आणि जमनालाल बजाज संस्थेच्या इमारतींच्या बांधकामाचा विचार करावा. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. १५ | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नविन महाविद्यालय सुरू करण्यासाठी इरादापत्र प्राप्त केलेल्या संस्थेच्या अंतिम मान्यतेसाठी तज्ञ समितींचा अहवाल प्राप्त झालेले प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.<br>शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नवीन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी) सुरु करण्याकरता शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मान्यता -२०१९/(२४९/१९) माशी -४, दिनांक ३१ जानेवारी, २०२० नुसार ईरादापत्र प्राप्त केलेल्या २५ संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधा तपासण्याकरिता गठित केलेल्या तज्ञ समितीचे अहवाल, अधिष्ठाता मंडळाचे अभिप्राय व अपात्र प्रस्तावावरील अपिलांवर कुलगुरूंच्या सुनावणीनंतर निर्णय या सर्वांचे अवलोकन करून २२ संस्थांचे प्रस्ताव 'परिशिष्ट-अ' प्रमाणे शासनाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात आली. (परिशिष्ट-अ) सोबत जोडले आहे.<br>परिशिष्ट-अ मधील क्र. ०५, ०७, १७ अपात्र करण्यात आले व ते प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येऊ नये, असे ठरले. | |
| बाब क्र. १६ | विद्‌वत्त परिषद दिनांक २९ जुन, २०२१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. ५.४......... | विद्याविषयक प्राधिकरणे बैठका आणि सेवा |
| ठराव | विद्‌वत्त परिषद दिनांक २९ जुन, २०२१ रोजीच्या सभेच्या बाब क्रमांक. 5.4(N), 5.5(N), 5.6 (N), 5.7(N), 5.8(N), 5.9(N), 5.10(N), 5.11(N), 5.12(N), 5.13(N), 5.24(N), 5.25(N), 5.26(N), 5.27(N), 5.28(N), 5.34(N), 5.47(N), 5.48(N), 6.23(N), 6.24(N), 6.25(N), 6.26(N), 6.27(N), 6.28(N), 6.29(N), 6.30(N), 6.31(N), 7.4(N), 8.1(N), 8.2(N), 8.3(N), 8.4(N), 8.5(N), 8.6(N), 8.7(N), 8.8(N), 8.9(N), 8.10(N), 8.11(N), 8.12(N), 8.13(N), 8.14(N), 8.15(N), 8.16(N), 8.17(N), 8.18(N), 8.22(A), 8.23(N), 8.24(A), 8.25(A), 8.26(A), 8.27(N) and 8.28(N) च्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. १७ | विद्वत्त परिषद दिनांक २९ जुन, २०२१ रोजीच्या सभेच्या इतिवृत्तातील बाब क्र. ९.२० आणि ९.२६ व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | वि. प्रा. बैठका आणि सेवा |
| ठराव | विद्वत्त परिषद दिनांक २९ जुन, २०२१ रोजीच्या सभेच्या इतिवृत्तातील बाब क्र. ९.२० (Grant of Autonomous Status & Governance Structure for Autonomous University/ Institute/ Department/ School/ Centre) आणि ९.२६ (The concept of Umbrella School & thereby Formation and Establishment of School of Indian Languages, School of English and Foreign Languages, School of Social Sciences and School of Performing Arts) बाबत मा. प्र-कुलगुरूंनी सभागृहास अवगत केले. सर्वांनी एकमताने त्यास मान्यता दिली. तसेच Schools या नवीन संकल्पनेअंतर्गत विविध विभागांमार्फत सुरू होणा-या उपक्रमांबाबत सर्व सभासदांनी मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले. | |
| | आयत्यावेळी आलेल्या बाबी | |
| बाब क्र. १८ | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ यांनी मान्यतेसाठी सादर केलेले सामंजस्य करार. | संशोधन, प्रशासन आणि विस्तार विभाग |
| ठराव | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळ यांनी प्रस्तावित केलेल्या सामंजस्य करारांना मान्यता देण्यात आली. मात्र सामंजस्य करारांवर स्वाक्ष-या करण्यापुर्वी यातील कायदेशीर बाबी कायदेतज्ञाकडुन तपासून घेवून मगच स्वाक्ष-या कराव्यात असेही ठरले. (सामंजस्य करारांची यादी सोबत जोडली आहे.) परिशिष्ट-अ<br>मा. कुलगुरूंनी सामंजस्य करार समितीच्या सर्व सदस्यांनी खुप मेहनत घेवून अत्यंत उत्कृष्टपणे कामकाज करून सर्व सामंजस्य करारांबाबतचा सखोल अहवाल दिल्याबद्ल त्यांचे विशेष अभिनंदन केले. | |
| बाब क्र. १९ | मा. उच्च न्यायालय, मुंबई. याचिका क्र. ४९५९/२०१७ श्री. उत्तम आर. पाटील विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर. | महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष |

| | | |
|---|---|---|
| ठराव | सदरबाबत चर्चेअंती असा निर्णय घेण्यात आला की, विद्यापीठास प्राप्त झालेल्या कायदेशीर सल्ल्यानुसार श्री. उत्तम पाटील यांच्या मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे. त्या विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालयात जाऊ नये. | |
| बाब क्र. २० | क्रिडा व शारिरीक शिक्षण मंडळ यांच्या दिनांक २७ जुलै, २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर झालेल्या बाब क्र. २ नुसार "क्रिडा विज्ञान व व्यवस्थापन अत्युत्कृष्ट केंद्र" स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत. | क्रिडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव | क्रिडा व शारिरीक शिक्षण मंडळ यांच्या दिनांक २७ जुलै, २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये बाब क्र. २ अन्वये "क्रिडा विज्ञान व व्यवस्थापन अत्युत्कृष्ट केंद्र" याची स्थापना करण्यास मंजुरी देण्यात आल्याचे मा. प्र-कुलगुरूंनी सभागृहास सांगितले व या नाविन्यपूर्ण केंद्राच्या स्थापनेमुळे तळागाळापासून सर्व खेळाडू विद्यार्थ्यांना होणारे फायदे विषद केले. सर्वानुमते सदर केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.<br>तसेच क्रिडा संचालक हे पद महाविद्यालय स्तरावर भरण्यासाठी पुन्हा एकदा परिपत्रक काढावे, तसेच शासन स्तरावरही सदर बाबत पाठपुरावा करावा असे मा. कुलसचिव यांना सांगण्यात आले. | |
| बाब क्र. २१ | The UNIVERSITY seeks services of IPL, a Government of India Undertaking, promoted by India Infrastructure Finance Company Limited. (IIFCL) | पा. सु. नि. अंमलबजावणी व देखभाल विभाग |
| ठराव | मा. प्र-कुलगुरूंनी सभागृहास अवगत केले की, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनुसार विद्यापीठाच्या विकासकामांबाबत मा. कुलगरुंनी Special Project Committee बनविलेली असून त्यांच्या बैठकाही पार पडल्या आहेत. या विकास कामांबाबत मार्गदर्शन करण्यासाठी IPL या भारत सरकारच्या अंगीकृत संस्थेची सेवा घेण्याच्या कराराचा मसुदा मंजुरीसाठी सभागृहास सादर करण्यात आला व त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. तसेच | |

| | | |
|---|---|---|
| | त्यांना याबाबत Letter of intent देण्यासही मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. २२ | To read and approve the minutes of Finance and Accounts Committee Meeting held on 3rd July, 2021 under Section 94(2) of the Maharashtra Public Universities Act, 2016. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | The Minutes Finance and Accounts Committee Meeting held on 3rd July, 2021 under Section 94(2) of the Maharashtra Public Universities Act, 2016 were accepted. | |
| बाब क्र. २३ | सिंधुदूर्ग जिल्हातील सावंतवाडी येथे मुंबई विद्यापीठाचा उपपरीसर सुरू करण्यासाठी भाडेतत्वावर तात्पुरती जागा मिळणेबाबत. | Engg |
| ठराव | मा. कुलगुरूंनी सभागृहास अंतिमत: अवगत केले की, सिंधुदूर्ग जिल्हातील सावंतवाडी येथे विद्यापीठाचा उपपरीसर सुरू करण्याबाबत भाडयाची तात्पुरती जागा मिळण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत आणि मा. माजी मंत्री श्री. दिपक केसरकर यांचेही मार्गदर्शन लाभले आहे, त्यानुसार तेथे भेट देऊन जागा ठरविण्यात येईल व लवकरच उद्घाटनही करण्यात येईल. सदर प्रस्तावास सर्व सदस्यांनी मान्यता दयावी. तसेच रायगड येथे उपपरीसर सुरू करण्यासाठी श्री. प्रदिप सावंत यांनीही व्यक्तीश: प्रयत्न करावे असे मा. कुलगुरूंनी सांगितले.<br>सर्वानुमते यास मंजुरी देण्यात आली. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

उपकुलसचिव

प्रभारी कुलसचिव

प्र-कुलगुरू

इतिवृत्त मंजूर

कुलगुरू